# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**
(Govt. of Maharashtra Undertaking)


जा. क्र. मप्राशिप/सशिअ/देखभाल अनुदान/२०१७-१८/९३६८ दिनांक 21 JUN 2017

**विषय: सन २०१७-१८ मध्ये देखभाल अनुदानाच्या विनियोगाबाबत.**

सन २०१७-१८ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांसाठी वर्गखोल्यांच्या प्रमाणात देखभाल अनुदान या लेखाशिर्षाखाली दिनांक ०९/०२/२०१७ रोजीच्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीतील इतिवृत्तात तरतूद मंजूर झाली आहे. मंजूर देखभाल अनुदान शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर दिनांक १५ जुलै, २०१७ अखेरपर्यंत वर्ग करण्यात यावे. याबाबतचे निकष सुधारित सर्व शिक्षा अभियान अंमलबजावणी आराखडा व Manual on Financial Management & Procurement मधील मुद्दा क्र. २७.१ ते २७.१५ प्रमाणे अनुदान विनियोगाची कार्यवाही करण्यात यावी. शालेय भौतिक सुविधा सुस्थितीत ठेवण्यासाठी, शाळा आकर्षक, अध्ययन-अध्यापनासाठी आनंददायी वातावरण निर्मितीसाठी या अनुदानाचा उपयोग करावा.

गुणवत्तापूर्ण शाळेस समाज मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करत आहे. याची प्रचिती समाजाने आत्तापर्यंत शाळांना दिलेल्या रू. ३०१.०० कोटी आर्थिक सहभागातून दिसून येते. अशाच प्रकारचा सहभाग सर्व शाळांना मिळविणे शक्य आहे.

राज्यात सध्या डिजीटल शाळा, तंत्रस्नेही शिक्षक, प्रगत शाळा, स्पोकन इंग्लिश, शाळा सिद्धी, समाज सहभाग, वाचन प्रेरणा दिवस, स्वच्छ महाराष्ट्र स्वच्छ विद्यालय यासारख्या चळवळी (Movements) सुरू आहेत. यातून साध्य होणाऱ्या परिणामांचा लाभ घेण्यासाठी या अनुदानाचा वापर करता येईल.

भारत सरकारने तयार केलेले व महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाने मराठीत भाषांतरीत केलेले Learning Outcomes शाळेच्या दर्शनी भागामध्ये लावण्यासाठी सदरचे अनुदान उपलब्ध आहे.

या अनुदानाचा व समाज सहभाग त्यामध्ये मिळवून शालेय भौतिक सुविधांमध्ये वाढीशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व



Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

जिल्हा परिषद व महानगरपालिकांसाठी मंजूर भौतिक लक्ष्य व आर्थिक तरतूद वित्तीय अंदाजपत्रकामध्ये नमूद केली आहे. संयुक्त आढावा पथकाच्या सूचनांच्या अनुषंगाने, अनुदान विनियोगाबाबतचा तपशिल शालेय फलकावर प्रदर्शित (Display) करण्यात यावा.

**(नंद कुमार भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

**प्रत : माहितीस्तव,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
५) प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, सर्व जिल्हे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
७) शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व).